नियमित दिवाणी दावा क्र. १०७६/२०१५

नि.क्र. ५६

## <u>निशाणी क्र. ५६ खालील आदेश</u>

CNRNO.MHSO020030852015

वारस अभिलेखात घेण्यासाठी त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, वादीने सदर दावा मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील वादी क्र.३ तुकाराम दगडु पवार हे दिनांक २४.०३.२०१८ रोजी मयत झाले आहेत. त्यांना या अर्जात नमुद केल्याप्रमाणे एकुण ६ वारस आहेत. सदरील वारसांना मयताचे पश्चात दावा चालविण्याचा अधिकार आहे. मयत वादीस याव्यतिरीक्त इतर कुणीही वारस नाहीत. त्यामुळे वादींनी विनंती केली की मयत वादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी व दाव्यात त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

३. प्रतिवादींतर्फे अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांनी वादीने वेळेत वारस अभिलेखावर घेतले नसल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी क्र.३ हे दिनांक २४.०३.२०१८ रोजी मयत झाले असल्याचे कथन केले आहे. तसेच प्रस्तुत दावा मोजणी होवुन मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला असल्यामुळे दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होणे आवश्यक आहे. त्याशिवाय वादी क्र.३ च्या हक्कावर योग्य तो निर्णय होणार नाही. अर्ज दिनांक २१.०६.२०१८ रोजी अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्ज मुदतीत आहे. परिणामी वादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. सबब पुढील आदेश पारीत

करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने नियत कालावधीमध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

Digitally signed by ALOK VITTHALRAO DESHPANDE
Date: 2024.05.02 12:04:25 +0530

( आलोक वि. देशपांडे)

दि. ३०.०४.२०२४. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माळशिरस.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file/order is same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| a) Name of the Stenographer | : | Arun K. Vibhute (Grade III) |
| b) Court | : | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Malshiras. |
| c) Order signed by P.O. on | : | 30/04/2024 |
| d) Order uploaded on | : | 02/05/2024 |